महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७९७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/कार्यशाळा/२०२२/ 411

दिनांक : २४.०१.२०२२.
24 JAN 2022

परिपत्रक

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, कोल्हापूर यांचे विश्वविक्रमी आवाजाच्या कार्यशाळेच्या नियोजनाबाबत सर्व संबधितांना कळवून कार्यशाळेत सहभाग नोंदविणेबाबत...

संदर्भ : १) श्री. यशवंत शितोळे, अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, कोल्हापूर यांचे पत्र क्र. MITSC/OUT/JANUARY2022/M/519, दिनांक १५.०१.२०२२.
२) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. १०/एनजीपी/कार्यशाळा/२०२२/८२ दिनांक २४.०१.२०२२.

उपरोक्त विषयास अनुसरुन, उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत राबविल्या जाणा-या विविध अभिनव उपक्रमांपैकी शिक्षकांसाठी सुरु केलेल्या एक महत्वकांशी उपक्रम म्हणजे "आवाज गुरुजनांचा वेध देशाच्या भवितव्याचा" हा उपक्रम २६ जानेवारी, २०२२ पासून सलग १०० दिवस राज्यातल्या ५० हजार शिक्षकांसाठी या पध्दतीच्या कार्यशाळा आयोजित केल्या जाणार असल्याबाबत महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांनी संदर्भ क्रमांक १ मधील पत्रान्वये मा. मंत्री. (उच्च व तंत्रशिक्षण) महोदयांना कळविलेले आहे.

संदर्भ क्रमांक १ मधील पत्रासोबत जोडलेल्या संकल्पना प्रपत्रामध्ये सदर कार्यशाळेबाबत सविस्तर तपशिल दिलेला आहे. सदर कार्यशाळेमध्ये सहभागी होण्याकरीता नावनोंदणी दिनांक १८.०१.२०२२ ते २५.०१.२०२२ पर्यंत असून त्याची लिंक देण्यात आलेली आहे. तरी आपल्या संस्थेमधील जास्तीत जास्त शिक्षकांना त्यांचा सहभाग नोंदविणेबाबत आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे. सोबत संदर्भ क्रमांक १ मधील पत्र (प्रपत्रासह) माहितीस्तव जोडण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १०/एनजीपी/कार्यशाळा /२०२२/ ८२ दिनांक :

24 JAN 2022

प्रति,
मा. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/ नागपूर/ नाशिक/पुणे.

**विषय: महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, कोल्हापूर यांचे विश्वविक्रमी आवाजाच्या कार्यशाळेच्या नियोजनाबाबत सर्व संबधितांना कळवून कार्यशाळेत सहभाग नोंदविणेबाबत.**
**संदर्भ: श्री यशवंत शितोळे, अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक : MITSC/OUT/JANUARY २०२२/M/५१९, दिनांक : १५.१.२०२२.**

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये, शिक्षकांसाठी सुरु केलेल्या "आवाज गुरुजनांचा वेध देशाच्या भवितव्याचा" हा उपक्रम २६ जानेवारी, २०२२ पासून सलग १०० दिवस राज्यातल्या ५० हजार शिक्षकांसाठी या पध्दतीच्या कार्यशाळा अयोजित केल्या जाणार असल्याचे मा. मंत्री, (उच्च व तंत्रशिक्षण विभाग) महोदयांना कळविण्यात आलेले आहे. सदर पत्राची प्रत ईमेलव्दारे मा. मंत्री महोदयांच्या कार्यलयामार्फत या संचालनालयास आवश्यक पुढील कार्यवाहीसाठी पृष्ठांकित करण्यात आलेली आहे. पत्राची सहपत्रासह प्रत सोबत जोडली आहे.

तरी, सदर पत्राच्या अनुषंगाने उपरोक्त उपक्रमाबाबत आपल्या स्तरावरुन सर्व संबधितांना कळवून कार्यशाळेत सहभाग नोंदविणेबाबत कळविण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(डॉ. गोविंद संगवई)
सहा.संचालक (तां.),
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

Directorate Of Technical Education
Maharashtra, Mumbai, India

Dr. Abhay Wagh <director@dtemaharashtra.gov.in>

---

# महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, कोल्हापूर यांचे विश्वविक्रमी आवाजाच्या कार्यशाळेच्या नियोजनाबाबत...सर्व संबधितांना कळवून कार्यशाळेत सहभाग नोंदविणेबाबत

1 message

---

**UDAY SAMANT** <udaysamant.minister@nic.in> Thu, Jan 20, 2022 at 6:13 PM
To: director.dhepune@nic.in, director <director@dtemaharashtra.gov.in>, director <director@msbte.com>, director dol <director.dol@maharashtra.gov.in>, Director Art <directorateofart@gmail.com>, spdrusamah <spdrusamah@gmail.com>
Cc: psec higheredu <psec.higheredu@maharashtra.gov.in>, sec higheredu <sec.higheredu@maharashtra.gov.in>, Dattarya Kahar <Dattatraya.kahar@nic.in>, SATISHJAGDEORAOTIDKE UNDERSECRETARY <satish.tidke@nic.in>, uvajagar <uvajagar@gmail.com>, YOGESH MAHANGADE <yogesh.mahangade@gov.in>

Sir/ Madam,

Kindly please find the attachment regarding above mention subject and do the needful

Thank You

Office of the
Minister, Higher & Technical Education
501, 5th Floor, Main Building, Mantralaya,
Madam Cama Marg, Mumbai 400032.
Telephone : 022 22022100 / 022 22023992
Email :- ministerudaysamant@gmail.com
udaysamant.minister@nic.in

Azadi Ka Amrit Mahotsav

---

28 All JD & Project Dir Rusa_MITSC.pdf
610K

6 JD's

21/1

21/01/2022

आ. क्र. मंत्री/उ. व तं. शि./व्ही.आय.पी./२८/२०२२
२०/०१/२२

# Maharashtra Information Technology Support Center

# महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

महासंचालक (सर्व)
प्रकल्प संचालक (कौशल्य)

MITSC/OUT/JANUARY 2022/M/519 दि.15-01-2022

**मा. ना.उदयजी सामंत**
मंत्री उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
महाराष्ट्र शासन

तपासून कार्यवाही करावी

विषय : - विश्वविक्रमी आवाजाच्या कार्यशाळेच्या नियोजनाबाबत..............

(उदय सामंत)
मंत्री
उच्च व तंत्रशिक्षण
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास विनंती अशी की, आपल्या भविष्यवेधी नेतृत्वाखाली उच्च व तंत्र शिक्षण विभागामध्ये अनेक विविध अभिनव उपक्रम राबवले जात आहे, यापैकीच एक महत्त्वाकांक्षी उपक्रम म्हणजे शिक्षकांसाठी आपण सुरु केलेल्या **"आवाज गुरुजनांचा वेध देशाच्या भवितव्याचा"** हा आवाजाच्या कार्यशाळेचा उपक्रम आहे. सुप्रसिद्ध ऑडिओलॉजीस्ट डॉ. सोनाली लोहार यांच्या सहकार्याने राज्यातल्या शिक्षकांसाठी या पद्धतीचा उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने एक विश्वविक्रमी उपक्रमाला सुरुवात केली जात असून 26 जानेवारी **2022 पासून सलग 100 दिवस** राज्यातल्या **50 हजार** शिक्षकांसाठी या पद्धतीच्या कार्यशाळा आयोजित केल्या जाणार आहे. तरी यासाठी सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू,

श्री. यशवंत शितोळे
अध्यक्ष,
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

# संकल्पना

भारत आता तरुणांचा देश म्हटला जातो. या तरुणांच्या देशांमध्ये 70 टक्के पेक्षा जास्त लोकसांख्या जेव्हा युवा आहे, तेव्हा निश्चितच आर्थिक महासत्ता होण्याचे स्वप्न प्रत्येक भारतीयाला खुणावत आहे. या युवकांच्या हाताला काम आणि डोक्याला विचार देण्यासाठी सर्वात मोठी आणि महत्त्वाची जबाबदारी आहे. ती आपल्या शिक्षकांच्या वर. "गुरुविना कोण दाखवील वाट" हे संतांचे पाठांतर करत करत मोठी होणारी पिढी करिअरच्या वाटेवर प्रत्येक वेळी मार्गदर्शनासाठी ज्यांच्याकडे भक्तीने पाहते ते म्हणजे आपण सर्व शिक्षक। समाजामध्ये कलाकार, राजकीय नेतृत्व करणारी मंडळी, व्यवसायिक नेतृत्व करणारी मंडळी हे सर्व "प्रोफेशनल व्हॉइस युजर" म्हणून गणले जातात पण या सर्वांच्या पेक्षा जास्त महत्त्वाचा आहे तो आपला शिक्षक आणि या शिक्षकांचा आवाज।

आवाजाची काळजी घेण्यासाठी आणण आवाजाची पोत सुधारण्यासाठी त्याचबरोबर व्यावसायिक दृष्ट्या अधिकाधिक अचूकपणे आवाजाचा वापर करण्यासाठीची क्षमता प्रत्येक शिक्षकांच्यामध्ये असणे गरजेचे आहे. आणि त्यासाठी आवश्यक आहे ते म्हणजे आवाजच शास्त्र समजून घेणे, आवाज निर्माण कसा होतो हे जाणून घेणे त्याचप्रमाणे शरीरामध्ये दीर्घकालीन परिणाम करणारे काही आजार होत असताना आवाजाच्या माध्यमातून त्यांची चाहूल सगळ्यात आधी कशा रीतीने लागू शकते हे जाणून घेणे. संवादाच्या या सगळ्यात महत्त्वाच्या माध्यमाची काळजी कशी घ्यावी हे सर्व प्रत्येक शिक्षकाला माहीत असले पाहिजे. त्यामुळेच आम्ही घेऊन आलो आहोत आपल्यासाठी आपल्या सर्व युवा पिढी घडवणाऱ्या शिक्षकांच्यासाठी, प्राध्यापकांसाठी आणि या सर्व शिक्षण व्यवस्थेचे नेतृत्व करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना साठी एक "आवाजाची कार्यशाळा" !

सुप्रसिद्ध व्हॉइस थेरपिस्ट सोनाली लोहार या देशातील काही नामवंत ऑडिओलॉजीस्ट आणि स्पीच लँग्वेज पॅथॉलॉजिस्ट पैकी एक आहेत. त्यांच असं स्वप्न आहे की, त्यांच्या या ज्ञानाचा उपयोग अज्ञानातून पिढी घडवणारे आणि पर्यायाने देशाचे भविष्य घडवणारे शिक्षक यांच्यासाठी झाला पाहिजे. शिक्षकांच्या आवाजाचे उत्तम स्वास्थ्य आणि आवाजामधील झालेली प्रगती ही विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन करण्याच्या प्रवासात अत्यंत उपयुक्त ठरेल असं त्यांना वाटतं. आणि म्हणूनच त्यांनी महाराष्ट्रातील प्रत्येक व प्राध्यापकांसाठी या आवाजाची कार्यशाळा ना नफा ना तोटा तत्त्वावर घ्यावयाचा योजले आहे. व्यावसायिक तत्त्वावर म्हणून ज्या कार्यशाळेसाठी 20 ते 25 हजार रुपये खर्च येऊ शकलो, ती कार्यशाळा आज "आवाज गुरुजनांचा देशाच्या भविष्याचा" या उपक्रमांतर्गत केवळ रुपये 1535/-(GST वगळता) मध्ये उपलब्ध होणार आहे, तरी याचा फायदा करून घ्यावा. आपल्या आवाजाची काळजी आपल्या भविष्याची काळजी आहे आणि आपले भविष्य पर्यायाने युवा पिढी घडवण्यासाठी आणि देशाच्या विकासासाठी अतिशय महत्त्वाचा आहे. त्यामुळे देशाच्या प्रगतीमध्ये अतिशय महत्त्वाचा वाटा असणारे आपणास सर्व गुरुजनांनी या कार्यशाळेमध्ये सहभागी व्हावे ही विनंती.

**नाव नोंदणी** :- 18 जानेवारी 2022 ते 25 जानेवारी 2022 पर्यंत

**सहभागी होण्यासाठी लिंक** :- https://play.google.com/store/apps/details?id=com.mitsc||